Epaper

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. ८ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७८। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

: धुळ्याच्या लेकीचा राष्ट्रीय स्तरावर डंका; पद्मश्री अहिरेला 'मिस इंडिया'चा किताब!

(पान २ वर)



» Selected

नातवाला वाचवताना आजोबा-मामाचाही तलावात बुडून मृत्यू

मालेगाव: मेंढ्या धुताना पाय घसरून खोल पाण्यात बुडणाऱ्या १५ वर्षीय नातवाला वाचविण्यासाठी तलावात उडी मारलेल्या आजोबा आणि मामाचाही बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मालेगाव तालुक्यातील कजवाडे येथील सातवडे पाझर तलावात रविवारी (दि. ४) दुपारी चारच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील पिता-पुत्रासह तिघांचा मृत्यू झाल्याने कजवाडे गावावर शोककळा पसरली आहे.मृतांमध्ये बाबू गंगाराम गोयकर (५४), हरी बाबू गोयकर (२८) आणि भूषण रघुनाथ करनर (१५) या तिघांचा समावेश आहे. तिघेही कजवाडे येथील रहिवासी होते.मिळालेल्या माहितीनुसार, बाबू गोयकर, त्यांचा मुलगा हरी आणि नातू भूषण हे तिघे मेंढ्या धुण्यासाठी सातवडे पाझर तलावावर गेले होते. मेंढ्या धुत असताना भूषणचा अचानक पाय घसरला आणि तो खोल पाण्यात बुडू लागला.

कार्यकर्ते खचल्याची प्रफुल्ल पटेलांची कबुली; तटकरेंपाठोपाठ पटेलांकडूनही नाराजीला दुजोरा

पुणे पदवीधरपदवीधर'च्या जागेने राष्ट्रवादीत खदखद!

पाच जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना धक्का, 'मवाळ धोरण'वर पक्षांतर्गत सवाल

जन सम्राट टाईम्स

पुणे | ।महायुतीतील जागावाटपात पुणे पदवीधर मतदारसंघाची जागा भाजपच्या वाट्याला गेल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत अस्वस्थता उफाळून आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनीच कार्यकर्ते खचल्याची स्पष्ट कबुली दिल्याने या नाराजीला आता वरिष्ठ नेतृत्वाकडूनही दुजोरा मिळाला आहे.

हा मतदारसंघ राष्ट्रवादीचा पारंपरिक मतदारसंघ मानला जात असताना जागा गमावल्याने पुण्यासह पाच जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांमध्ये निराशा निर्माण झाल्याचे पटेल यांनी म्हटले आहे. पुणे पदवीधरची जागा भाजपकडे; राष्ट्रवादीत नाराजी, कार्यकर्त्यांच्या खच्चीकरणाची पटेलांची कबुली महायुतीतील विधान परिषद जागावाटपाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाली. या चर्चेनंतर पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपचा उमेदवार असेल, असे संकेत मिळत होते. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर भाजपकडेच ही जागा गेल्याचे स्पष्ट झाले. भाजपने पुणे पदवीधर मतदारसंघासाठी डॉ. स्मिता जाधव यांना उमेदवारी दिली आहे राष्ट्रवादीसाठी हा निर्णय विशेष धक्कादायक



मानला जात आहे. पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने, भाजप जागा सोडत नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर राष्ट्रवादीनेही स्वतंत्र उमेदवार देऊन दबावाचे राजकारण करायला हवे होते, असे मत व्यक्त केले. शिवसेनेने पुणे शिक्षक मतदारसंघात अधिकृत जागा न मिळूनही मंगेश चिवटे यांना एबी फॉर्म देऊन अर्ज दाखल करण्याची भूमिका घेतल्याचा दाखला या नेत्याने दिला. पुणे पदवीधर जागेचा आग्रह सोडू नये आणि जागावाटपाच्या चर्चेत दबावाला बळी पडू नये, असा सल्ला पक्षातील काही नेत्यांनी नेतृत्वाला दिला होता. मात्र, अखेरीस नेमक्या कोणत्या परिस्थितीत पुण्याची जागा सोडण्याचा निर्णय घेण्यात आला, याची माहिती पक्षातील अनेक नेत्यांना नसल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, जागा गमावल्यानंतर पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली नाराजी प्रफुल्ल पटेल यांच्या वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. पुणे पदवीधर हा केवळ एका निवडणुकीचा विषय नसून संघटनात्मक ताकदीशी जोडलेला मतदारसंघ असल्याची भावना राष्ट्रवादीतील काही नेत्यांकडून व्यक्त होत आहे. महायुतीतील जागावाटपावरून यापूर्वीही राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून नाराजी व्यक्त झाली आहे. पुणे पदवीधरची जागा भाजपकडे गेल्यानंतर पक्षाच्या स्थानिक संघटनेसमोर कार्यकर्त्यांचा उत्साह कायम ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, महायुतीत बंडखोरीचीही स्थिती निर्माण झाली असून, भाजपचे अधिकृत उमेदवार जाहीर झाल्यानंतर काही इच्छुकांनी स्वतंत्र अर्ज दाखल केल्याचे वृत्त आहे. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, राष्ट्रवादीच्या भविष्यातील राजकीय वाटचालीबाबत पक्षातील एका नेत्याने केलेल्या दाव्यामुळेही चर्चेला उधाण आले आहे. आघाडीत सहभागी होण्याबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचा दावा संबंधित नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर केला आहे.

या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही

पक्षातील आठ खासदारांच्या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर सरकारमध्ये सहभागी होण्याची चर्चा झाली होती, तसेच एकनाथ शिंदे यांच्याकडून खासदारांना सोबत घेण्याच्या हालचालींबाबतही चर्चा झाल्याचा दावा या नेत्याने केला. मात्र, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी विलीनीकरणाबाबत अनुकूलता न दाखवल्याने हा प्रस्ताव पुढे गेला नाही, असा दावा करण्यात आला आहे. या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. पुणे पदवीधर मतदारसंघाच्या जागावाटपाने राष्ट्रवादीसमोर केवळ निवडणुकीचे आव्हान उभे केलेले नाही.

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन, वयाच्या 75 व्या वर्षी घेतला शेवटचा श्वास!

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली। प्रतिनिधी: मराठी इंडस्ट्रीतून धक्कादायक बातमी समोर येत आहे. मराठी इंडस्ट्रीसाठी हा एक प्रकारचा काळा दिवसच मानला जाईल. मराठीतील दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन झाले आहे. त्यांचा मुलगा मल्हार पाटेकर याने या दु:खद बातमीला दुजोरा दिला. नाना पाटेकर यांना 8 ऑक्टोबर रोजी सकाळी हृदय विकाराचा झटका आला. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्या मुलाने दिलेल्या माहितीनुसार ते गोव्यातील होते. पहाटे 5.22 वाजता त्यांना तीव्र हृदय विकाराचा झटका आला. त्यांना गोव्यातील रुग्णालयात लगेचच भरती केले. डॉक्टरांनी त्यांना 45 मिनिटं सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. पण काळाने घाला घातलाच... 75 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मिळालेल्या माहितीनुसार 45 मिनिटे सलग सीपीआर देऊनही त्यांना पुनरुज्जीवित करता आले नाही. याप्रकरणी 'मेडिको-लीगल केस' (MLC) नोंदवण्यात आली असून शवविच्छेदन केले जाईल अशी माहिती मणिपाल हॉस्पिटलचे ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी दिली. नानांनी आपल्या अभिनयाच्या एका वेगळ्या शैलीने प्रेक्षकांच्या मनात घर निर्माण केलेले. केवळ मराठीतच नव्हे तर बॉलिवूडमध्ये सुद्धा त्यांचा दबदबा होता. त्यांनी अनेक सुपरहिट सिनेमांमध्ये काम केले होते. केवळ अभिनयातच नव्हे तर समजाकार्यात सुद्धा त्यांनी मोठे योगदान दिले होते. सप्टेंबर 2015 मध्ये त्यांनी मकरंद अनासपुरेंसोबत मिळून नाम फाउंडेशनची स्थापना केली. या संस्थेद्वारे ते शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करायचे. नाना पाटेकर यांनी आईच्या इच्छेनुसार आपल्या घरी गणपती बसवायला सुरुवात केलेली.



त्याच्यासाठी ते फुलांची आरास स्वत: करायचे. यंदाही अवघ्या काही दिवसांपूर्वीच त्यांच्या घरच्या गणपतीचे फोटो समोर आलेले. हे फोटो अखेरचे असतील याची कोणालाच कल्पनासुद्धा नव्हती. त्यांच्या असंख्य चाहत्यांना त्यांच्या अशा जाण्याने मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे मुलगाच आहे.नाना पाटेकर यांची कारकीर्द नाना पाटेकर यांची गणना चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम अभिनेत्यांमध्ये केली जाते. नाना पाटेकर यांचे पूर्ण नाव विश्वनाथ पाटेकर असे होते. त्यांचा जन्म 1 जानेवारी 1951 मध्ये झाला. त्यांनी 1978 मध्ये 'गमन' या चित्रपटाद्वारे अभिनयात पदार्पण केले, परंतु 1986 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अंकुश' या चित्रपटामुळे त्यांना खरी ओळख मिळाली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी हिंदी आणि मराठी अशा दोन्ही चित्रपटसृष्टींमध्ये काम केले आहे. 'परिंदा', 'तिरंगा', 'क्रांतिवीर' आणि 'खामोशी' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली आणि आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी गंभीर भूमिकांपासून ते विनोदी आणि खलनायकी अशा विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत. 'परिंदा' मधील गँगस्टरच्या भूमिकेने सुपरहिट केले. त्यानंतर 'प्रहार', 'तिरंगा' व 'क्रांतिवीर' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी आपली 'ॲक्शन-ओरिएंटेड' अभिनेता म्हणून छाप पाडली. ते शेवटचे हाऊसफुल 5 मध्ये दिसले होते. मराठी इंडस्ट्रीतून धक्कादायक बातमी समोर येत आहे. मराठी इंडस्ट्रीसाठी हा एक प्रकारचा काळा दिवसच मानला जाईल. मराठीतील दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन झाले आहे. त्यांचा मुलगा मल्हार पाटेकर याने या दु:खद बातमीला दुजोरा दिला. नाना पाटेकर यांना 8 ऑक्टोबर रोजी सकाळी हृदय विकाराचा झटका आला. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्या मुलाने दिलेल्या माहितीनुसार ते गोव्यातील होते. पहाटे 5.22 वाजता त्यांना तीव्र हृदय विकाराचा झटका आला. त्यांना गोव्यातील रुग्णालयात लगेचच भरती केले. डॉक्टरांनी त्यांना 45 मिनिटं सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. पण काळाने घाला घातलाच... 75 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

सुरगाण्यात हायप्रोफाइल जुगार अड्डा उद्ध्वस्त; गुजरात 'कनेक्शन' उघड

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: सुरगाणा तालुक्यातील बर्डीपाडा गावाजवळ एका हॉटेलच्या मोकळ्या जागेत सुरू असलेल्या कथित 'हायप्रोफाइल' जुगार अड्ड्यावर नाशिक ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखा आणि सुरगाणा पोलिसांच्या संयुक्त पथकाने रविवारी (दि. ४) पहाटे छापा टाकून जुगाराचा डाव उधळून लावला. या कारवाईत गुजरातमधील सूरत, वलसाड, नवसारी तसेच दादरा-नगर हवेली परिसरातील १६ संशयित आढळून आले. त्यांच्याकडून ७३ लाख २ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पोलिस निरीक्षक राहुल मोरे, योगेश घोरपडे, सहायक पोलिस निरीक्षक दीपक निगळ, गायत्री जाधव तसेच अंमलदार प्रीतम लोखंडे यांच्या पथकाने पहाटे सुमारे पावणे चार वाजता बर्डीपाडा परिसरात कारवाई केली.पहाटे पावणे चारला धडक छापा बर्डीपाडा गावाजवळील एका हॉटेलच्या मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणावर जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. कारवाईदरम्यान जुगार खेळणारे तसेच खेळविणाऱ्या संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत रोख रक्कम आणि



इतर साहित्य असा एकूण ७३ लाख २ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या जुगार अड्ड्यावर गुजरातमधील विविध शहरांमधून संशयित सहभागी झाल्याचे प्राथमिक कारवाईतून समोर आले आहे. गुजरातमधून जुगारासाठी जमले संशयित पोलिसांच्या कारवाईत ताब्यात आलेल्या संशयितांमध्ये शाम नागू पवार (३९, सुरगाणा), विजय चंदू उकाळे (३९, सूरत), जिग्नेश सावलिया (३५, सूरत), राधाकृष्ण दुबे (४९, वलसाड), अनुराग शहा (२५, नवसारी), केशव वसावा (४९, सूरत), यश चोटलिया (२२, दादरा-नगर हवेली), साजिद शरीफ शेख (३३, वलसाड), जितेंद्र यश गिरी (४३, वलसाड), अश्विन शहा (४१, वलसाड), गुलाम मोहिउद्दीन अब्दुल मन्सुरी (६०, सूरत), हितेश पटेल (४२, सूरत), साहिब शेख (५०, सूरत), अब्दुल शेख (३६, सूरत), मुस्ताक शेख (५८, सूरत) आणि आरिफ शेख (४७, नवसारी बाजार) यांचा समावेश आहे. या कारवाईमुळे सुरगाणा तालुक्यातील जुगार अड्ड्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. गुजरातमधील विविध भागांतून संशयित एकत्र येऊन सुरगाण्यात जुगार खेळत असल्याने या प्रकरणामागे आणखी कोणाचे नेटवर्क आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जाण्याची शक्यता आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालाची तसेच संशयितांच्या परस्पर संबंधांची तपासणी सुरू केली असून, या जुगार अड्ड्याचे संचालन कोण करत होते.

दोन हजाराच्या नोटा बदलण्याच्या आमिषाने ६८ लाखांचा गंडा

निफाड : दोन हजार रुपयांच्या बंद नोटा पाचशे रुपयांच्या नोटांमध्ये बदलून देण्याचे तसेच त्यातून दुप्पट रक्कम मिळवून देण्याचे आमिष दाखवत ओझर येथील दोन व्यापाऱ्यांची तब्बल ६८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी ज्ञानेश्वर रामराव कदम यांनी ओझर पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, कदम यांची त्यांचे मित्र विश्वास बोरसे यांच्या माध्यमातून अश्विन पटेल आणि ताराचंद जैन यांच्याशी ओळख झाली.

पोलिस पतीच्या छळाला कंटाळून महिलेने घेतले विषारी औषध

जन सम्राट टाईम्स



नाशिक| प्रतिनिधी: नाशिकमध्ये पतीच्या कथित मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून एका महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दीपाली अनिल पवार (वय ३७) असे मृत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी त्यांचे पती अनिल पवार यांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना ९ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. दीपाली पवार या महात्मानगर परिसरातील निकेतन क्लासिक अपार्टमेंटमध्ये राहत होत्या. त्या जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे पती अनिल पवार हे नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असल्याची माहिती आहे. दोघांचा विवाह २०१४ मध्ये झाला होता. फ्लॅटच्या नावावरून दबावाचा आरोप कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दीपाली यांनी अहिल्यानगर येथे एक फ्लॅट घेतला होता. हा फ्लॅट सासरच्या व्यक्तीच्या नावावर करावा, यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय त्यांच्या चारित्र्यावर संशय घेत मानसिक त्रास देण्यात येत होता, तसेच मारहाणही केली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून या कथित छळामुळे दीपाली मानसिक तणावाखाली असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. अखेर या त्रासाला कंटाळून त्यांनी ५ ऑक्टोबर रोजी 'अल्फोस पेस्टिसाइड' नावाचे विषारी औषध प्राशन केले. स्वतः कार चालवत रुग्णालय गाठले विषारी औषध प्राशन केल्यानंतर दीपाली यांना चक्कर येणे आणि उलट्या होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी स्वतः कार चालवत गंगापूर रोडवरील एका खासगी रुग्णालयात धाव घेतली. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना नाशिकच्या सिव्हिल रुग्णालयात हलविण्यात आले. दीपाली यांचे भाऊ भूषण गायकवाड यांनी त्यांना पुढील उपचारासाठी पुन्हा खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांचा मृत्यू झाला. पतीा अटक; पोलिस तपास सुरू दीपाली यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पती अनिल पवार यांच्याविरुद्ध कारवाई करत त्यांना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने ९ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, दीपाली यांच्या मृत्यूमागील नेमकी कारणे, कथित छळाचे स्वरूप आणि तक्रारीतील आरोपांची सत्यता तपासली जात आहे. कुटुंबीयांनी केलेल्या आरोपांच्या आधारे पोलिसांकडून पुरावे आणि संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदविले जाण्याची शक्यता आहे. छळाला कंटाळून एका महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दीपाली अनिल पवार (वय ३७) असे मृत महिलेचे नाव आहे. या प्रकरणी कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी त्यांचे पती अनिल पवार यांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना ९ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

एमपीएससी विद्यार्थ्यांवर मालकी हक्क दाखवू नका; ते गुरेढोरे नाहीत!

'जेवायला नव्हे, अधिकारी व्हायला आलो आहोत' म्हणत राजकारण्यांवर निशाणा

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास दूर होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांवर कोणीही मालकी हक्क दाखवू नये; एमपीएससीचे विद्यार्थी काही गुरेढोरे नाहीत की कोणाच्याही मागे जातील, अशा शब्दांत वकील गुणरत्न सदावर्ते यांनी पुण्यातील आंदोलक विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राजकीय हस्तक्षेपावर टीका केली. एमपीएससी परीक्षांच्या प्रश्नांवरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सदावर्ते यांनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांच्या भावनांशी आपण सहमत असल्याचे सांगत त्यांनी परीक्षेवरील विश्वास कायम राहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. "आपण विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आलो आहोत. ज्यांना विषय समजतो त्यांनीच लोकसेवा आयोगाच्या कामकाजावर बोलावे," असेही ते म्हणाले. 'विद्यार्थ्यांवर तुमचे राजकारण लादू नका' एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे राजकीयीकरण होत असल्याचा आरोप करत सदावर्ते यांनी विविध राजकीय नेत्यांवर निशाणा साधला. "सगळे आंदोलक माझेच आहेत.

विद्यार्थ्यांवर कोणाचेही दळभद्री राजकारण लादू नका," असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांकडे गेले होते. त्यावेळी चर्चा झाली आणि कॉमन ड्राफ्टवर सह्या झाल्या. एमपीएससी अध्यक्षांच्या चौकशीचा मुद्दाही मान्य झाल्याचे सदावर्ते यांनी सांगितले. त्यामुळे आता विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा होण्याची



गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'आंदोलन कलंकित करू नका' सत्तेतील आमदार आणि मंत्र्यांच्या भूमिकेवरही सदावर्ते यांनी टीका केली. राजकारण्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात हस्तक्षेप करण्याऐवजी प्रश्नांच्या मुळाशी जावे, असे ते म्हणाले. आंदोलनाची दिशा भरकटल्यास त्याचा फटका विद्यार्थ्यांनाच बसतो. "आंदोलन कलंकित होता कामा नये," असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी एस. एम. जोशी पुलावर जाऊन संबंधितांशी चर्चा करण्याची तयारी दर्शवली. तसेच बारामतीच्या एसटी स्थानकावरही चर्चा करण्याचे आव्हान दिले.

'इसको हटाव, उसको हटाव'पुरते आंदोलन नको एमपीएससीच्या कार्यपद्धतीवर चर्चा करण्याची गरज असल्याचे सांगत सदावर्ते यांनी आयोगाच्या परीक्षा पद्धती आणि प्रश्नपत्रिकांबाबत मूलभूत प्रश्न उपस्थित केले."पुस्तिका कोणाच्या काळात बदलल्या? आयोगाच्या विषयपद्धतीवर चर्चा का होत नाही? केवळ 'इसको हटाव, उसको हटाव' एवढेच सुरू आहे," अशी टीका त्यांनी केली. एमपीएससीच्या कारभाराबाबत जबाबदारी निश्चित करताना केवळ एखाद्या व्यक्तीला हटविण्याची मागणी करण्यापेक्षा संपूर्ण व्यवस्थेवर चर्चा झाली पाहिजे,असेही त्यांनी सूचित केले. 'जेवायला नाही, अधिकारी व्हायला आलो आहोत' आंदोलक विद्यार्थ्यांना उद्देशून सदावर्ते यांनी आंदोलनाचा उद्देश लक्षात ठेवण्याचे आवाहन केले. "आपण येथे जेवायला आलेलो नाही, तर अधिकारी व्हायला आलो आहोत," असे ते म्हणाले. परीक्षा वेळेवर होऊ नये किंवा परीक्षेवरील विश्वास डळमळीत व्हावा, अशी परिस्थिती नेमकी कोणी निर्माण केली, याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा. सत्य परिस्थिती समोर आली तर त्याविरोधात आंदोलन करणे योग्यच आहे; मात्र आंदोलन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासह व्यापक व्यवस्थेचाही विचार करावा, असे त्यांनी सांगितले. सरकारला अध्यक्ष हटविण्याचा अधिकार आहे का? एमपीएससी अध्यक्षांच्या संदर्भातील निर्णयावरही सदावर्ते यांनी प्रश्न उपस्थित केला. अध्यक्षांना हटविण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे का, याचाही आंदोलक विद्यार्थ्यांनी विचार करावा, असे त्यांनी म्हटले. राजकीय आरोप-प्रत्यारोपांमध्ये विद्यार्थ्यांच्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी भूमिका घेत त्यांनी परीक्षा पद्धती, आयोगाची कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचा विश्वास या तीनही मुद्द्यांवर व्यापक चर्चा करण्याची गरज व्यक्त केली.

एमपीएससी आंदोलनावर हायकोर्टाचा लिखित आदेश

सरकारला निष्पक्ष परीक्षांसाठी कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित अनियमिततेविरोधात पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने बुधवारी (दि. ७) या प्रकरणी लिखित आदेश जारी करत विद्यार्थ्यांना आंदोलनातून माघार घेऊन अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले. त्याचवेळी राज्य सरकारला एमपीएससीच्या परीक्षा निष्पक्ष, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त पद्धतीने घेण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. टिकर : एमपीएससी आंदोलनावर हायकोर्टाचा आदेश; रस्ते अडवून आंदोलन नको, सरकारला तीन आठवड्यांत कृती आराखडा देण्याचे निर्देश न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केलेले नसून, राज्य सरकारने आतापर्यंत काही मागण्यांवर सकारात्मक पावले उचलल्याची नोंद केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, अशी भूमिका न्यायालयाने मांडली. न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेतली असून, सरकारने केलेल्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती देण्यास सांगितले आहे. 'विद्यार्थी समाजकंटक नाहीत; प्रश्न गंभीर असेल तर आंदोलनाचा अधिकार' सुनावणीदरम्यान न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या अधिकाराबाबतही महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थी समाजकंटक नाहीत आणि परीक्षेच्या प्रक्रियेत काही गैरप्रकार होत असल्याचे आढळल्यास त्यांना आवाज उठवण्याचा अधिकार



आहे, असे न्यायालयाने नमूद केले. मात्र, आंदोलन करताना सार्वजनिक रस्ते अडवून नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. पुणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र असल्याने विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची हौस नसते. ते मेहनत करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. त्यामुळे त्यांच्या तक्रारी गांभीर्याने ऐकून घेण्याची आवश्यकता असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले. रस्ते खुले ठेवण्याचे प्रशासनाला निर्देश आंदोलनाच्या नावाखाली सार्वजनिक वाहतूक आणि नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती पावले उचलावीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. रस्ते अडवून आंदोलन करता येणार नाही, मात्र आंदोलकांना त्यांच्या मागण्यांसाठी कायदेशीर मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार आहे. पोलिसांनी वाहतुकीला अडथळा होणार नाही, अशा ठिकाणी आंदोलनासाठी परवानगी देण्याचा विचार करावा, अशी सूचनाही न्यायालयाने केली आहे. त्यामुळे आंदोलनाचा मुद्दा आणि नागरिकांची गैरसोय यामध्ये संतुलन राखण्याची जबाबदारी प्रशासनावर सोपवण्यात आली आहे. सरकारकडून मागण्यांवर सकारात्मक पावले सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी सरकारने विद्यार्थ्यांच्या चार प्रमुख मागण्यांपैकी तीन मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्याचे न्यायालयाला सांगितले. मोठ्या प्रमाणावर रिक्त पदांची भरती, परीक्षा शुल्क कमी करण्याची मागणी आणि ऑफलाइन परीक्षा पद्धतीचा मुद्दा याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट केली आहे.

एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याबाबत मात्र कायद्यानुसार राज्य सरकारला थेट निर्णय घेता येत नसल्याचे सरकारने न्यायालयाला सांगितले. या संदर्भातील तक्रारींबाबत राज्यपालांकडे पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. तीन आठवड्यांत सरकारचा कृती आराखडा एमपीएससीच्या परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यासाठी राज्य सरकारने कोणती पावले उचलली आहेत, याचा विभागनिहाय तपशील आणि पुढील कृती आराखडा तीन आठवड्यांत न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, पुण्यातील तीन ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांपैकी एका आंदोलनातून माघार घेण्यात आली असून, इतर दोन ठिकाणी आंदोलन सुरू असल्याचे ताज्या वृत्तांतून समोर आले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानंतर आंदोलनाची पुढील दिशा काय राहते, याकडे आता विद्यार्थी आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे. असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने बुधवारी (दि. ७) या प्रकरणी लिखित आदेश जारी करत विद्यार्थ्यांना आंदोलनातून माघार घेऊन अभ्यासाकडे वळण्याचे आवाहन केले. त्याचवेळी राज्य सरकारला एमपीएससीच्या परीक्षा निष्पक्ष, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त पद्धतीने घेण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. टिकर : एमपीएससी आंदोलनावर हायकोर्टाचा आदेश; रस्ते अडवून आंदोलन नको, सरकारला तीन आठवड्यांत कृती आराखडा देण्याचे निर्देश न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केलेले नसून, राज्य सरकारने आतापर्यंत काही मागण्यांवर सकारात्मक पावले उचलल्याची नोंद केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, अशी भूमिका न्यायालयाने मांडली. न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेतली असून, सरकारने केलेल्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती देण्यास सांगितले आहे.'

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पारोळा नगरपरिषदेची अतिक्रमण हटाव मोहीम!



जन सम्राट टाईम्स

पारोळा | प्रतिनिधी : पारोळा शहरातील सार्वजनिक रस्ते, फुटपाथ, नाले, शासकीय तसेच नगरपरिषदेच्या मालकीच्या जागांवर झालेल्या अतिक्रमणांविरोधात नगरपरिषद प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली आहे. मुख्याधिकारी तुषार नेरकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथकाने शहरातील विविध भागांत प्रभावी कारवाई करत अनेक अतिक्रमणे हटविली.

त्यामुळे सार्वजनिक जागा मोकळ्या होण्यासह वाहतुकीला होणारे अडथळे दूर करण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना वेग आला आहे. या मोहिमेअंतर्गत सर्वप्रथम शहरातील नियोजित स्टेडियम परिसर, बसस्थानक परिसर, कजगाव नाका, स्वर्गीय मीनाताई ठाकरे व्यापारी संकुल, पीर दरवाजा, राजीव गांधी नगर तसेच इंदिरानगर परिसरातील पाण्याच्या टाकीजवळील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. मुख्य रस्ते, बाजारपेठ परिसर, सार्वजनिक मार्ग आणि फुटपाथवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले शेड, ओटे, फलक, हातगाड्या तसेच विविध प्रकारचे साहित्य हटविण्यात आले. शहरातील नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त सार्वजनिक जागा उपलब्ध करून देणे, वाहतुकीची कोंडी कमी करणे आणि नगरपरिषदेच्या मालकीच्या सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सार्वजनिक रस्त्यांवर अनधिकृतपणे साहित्य ठेवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांनाही प्रशासनाकडून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. कायदेशीर प्रक्रियेनंतर कारवाई महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम १७९ (१), (३), १८० व १८१ अन्वये अतिक्रमणांची पाहणी, नोंदणी आणि आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात आली.

संबंधित अतिक्रमणधारकांना नियमानुसार सूचना व नोटिसा देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अतिक्रमणे निष्कासित करण्यात येत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

ही कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता शहरातील अतिक्रमणांची पाहणी करून टप्प्याटप्प्याने पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. मोहिमेदरम्यान रात्री उशिरापर्यंत कारवाई सुरू होती.

सुजात आंबेडकरांविषयी आक्षेपार्ह पोस्ट; कॉन्स्टेबल व होमगार्डवर कारवाईची मागणी

वंचित बहुजन आघाडीचे फर्दापूर ठाण्यात निवेदन

जन सम्राट टाईम्स

फर्दापूर । प्रतिनिधी: वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांच्याविषयी सोशल मीडियावर कथितरीत्या आक्षेपार्ह व अश्लील भाषेत बदनामीकारक पोस्ट केल्याप्रकरणी फर्दापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस कॉन्स्टेबल व एका होमगार्ड जवानाविरोधात कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात फर्दापूर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले.

निवेदनावर सचिन भाऊ शिंदे (पूर्व तालुकाध्यक्ष), बनेखाँ पठाण (ता. अध्यक्ष, सिल्लोड) आणि मनोहर जगताप (ता. निरीक्षक) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सोशल मीडिया पोस्टचा आरोप निवेदनात नमूद केल्यानुसार, ३ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे संत एकनाथ रंग मंदिरात झालेल्या एका कार्यक्रमासाठी सुजात आंबेडकर उपस्थित होते. यावेळी एका विद्यार्थ्याने औरंगाबाद नामांतरासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर फर्दापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस कॉन्स्टेबल आणि एका होमगार्ड जवानाने सोशल मीडियावर सुजात आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह व अश्लील भाषेतील पोस्ट केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित पोस्टचा स्क्रीनशॉट पुरावा म्हणून निवेदनासोबत जोडल्याचेही सांगण्यात आले आहे. "पोलीस कर्मचाऱ्यांकडून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न" पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रमुख कर्तव्य कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आहे. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांकडून सोशल मीडियावर अशा प्रकारच्या पोस्ट करण्यात आल्यास त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक असल्याचे वंचित बहुजन आघाीने निवेदनात म्हटले आहे. संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया पोस्टची तातडीने चौकशी करून, पोस्ट आक्षेपार्ह व कायद्याचे उल्लंघन करणारी आढळल्यास संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करावा, तसेच विभागीय चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, दोन्ही कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

प्रशासन कोणती भूमिका घेते आणि चौकशीत नेमके काय निष्पन्न होते, याकडे आता लक्ष लागले आहे. वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांच्याविषयी सोशल मीडियावर कथितरीत्या आक्षेपार्ह व अश्लील भाषेत बदनामीकारक पोस्ट केल्याप्रकरणी फर्दापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस कॉन्स्टेबल व एका होमगार्ड जवानाविरोधात कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

: धुळ्याच्या लेकीचा राष्ट्रीय स्तरावर डंका; पद्मश्री अहिरेला 'मिस इंडिया'चा किताब!

कॅलिस्टा इंडिया २०२६ फॅशन शोमध्ये यश

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: धुळ्याची कन्या पद्मश्री पराग अहिरे हिने राष्ट्रीय स्तरावरील फॅशन शो स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत धुळ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पुणे येथे झालेल्या 'कॅलिस्टा इंडिया २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील फॅशन शो स्पर्धेत पद्मश्री हिने १२ ते १५ वयोगटात 'मिस इंडिया'चा किताब पटकावला. अभिनेत्री अमिषा पटेल यांच्या हस्ते किताब प्रदान करून तिचा विशेष सन्मान करण्यात आला. पद्मश्रीच्या या यशामुळे धुळे शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचले असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारतातील विविध राज्यांमधून आलेल्या सुमारे २० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामध्ये पद्मश्रीने आपल्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर अव्वल स्थान मिळवले. क्लास नाही, ऑनलाइन व्हिडिओतून घेतले धडे! पद्मश्रीने या यशासाठी कोणताही विशेष क्लास किंवा औपचारिक



प्रशिक्षण घेतले नसल्याचे सांगण्यात आले. ऑनलाइन उपलब्ध व्हिडिओंच्या माध्यमातून फॅशन शो, रॅम्पवॉक आणि सादरीकरणाचे बारकावे आत्मसात करण्याचा प्रयत्न तिने केला. घरातून मिळालेले कलेचे संस्कार, आई-वडिलांसह बहिणीची साथ आणि स्वतःची मेहनत यामुळे हे यश मिळाल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. "आता पुढचे लक्ष्य मिस इंडिया" राष्ट्रीय स्तरावर लहान वयोगटात 'मिस इंडिया'चा किताब मिळवल्यानंतर पद्मश्रीने आपल्या भविष्यातील ध्येयाबाबत उत्साह व्यक्त केला. "लहान वयोगटात मिस इंडिया झाले, आता पुढचे लक्ष्य मिस इंडिया हेच असेल," अशी प्रतिक्रिया पद्मश्री पराग अहिरे हिने व्यक्त केली. 'उडाण' हिंदी चित्रपटात कामाची संधी पद्मश्रीच्या या कलेची दखल घेत तिला 'उडाण' या हिंदी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल्याचे तिचे वडील बिल्डर पराग अहिरे यांनी सांगितले. या वयात मुलीने मिळवलेले यश निश्चितच अभिमानास्पद असून, चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल्याने संपूर्ण कुटुंब आनंदित असल्याची भावना त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. पद्मश्रीच्या राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे धुळे शहरातील कला व फॅशन क्षेत्रातील नवोदितांना प्रेरणा मिळाली असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

गुटखा-पानमसाल्यावर अन्न प्रशासनाची धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स

शिरपूर। प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा, पानमसाला व तंबाखूची विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन, धुळे विभागाने पळासनेर येथे धडक कारवाई केली. या कारवाईत मे. गजानन माऊली किराणा दुकानातून १,१३९ पाकिटे प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत १ लाख २९ हजार ३४१ रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पळासनेर, ता. शिरपूर येथील वीरेंद्रसिंग अजितसिंग गिरासे यांच्या मे. गजानन माऊली किराणा दुकानाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला पानमसाला, गुटखा आणि तंबाखूचा साठा आढळून आला. १,१३९ पाकिटांचा साठा जप्त कारवाईदरम्यान आढळून आलेला प्रतिबंधित साठा पुढील कारवाईसाठी शिरपूर तालुका पोलीस स्टेशन, सांगवी येथे आणण्यात आला. तेथे या साठ्याची मोजणी करण्यात आली असता एकूण १,१३९ पाकिटे आढळून आली. या साठ्याची अंदाजे किंमत ₹१,२९,३४१ असल्याचे प्रशासनाने नमूद केले. या प्रकरणी वीरेंद्रसिंग अजितसिंग गिरासे, रा. पळासनेर, ता. शिरपूर यांच्याविरुद्ध शिरपूर तालुका पोलीस स्टेशन, सांगवी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा विभागाची संयुक्त कारवाई ही कारवाई सह आयुक्त (अन्न), नाशिक मंगेश माने आणि सहायक आयुक्त (अन्न), धुळे गोपाल माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत आनंद पवार, अभिजीत जाधव, शशिकांत राणे, अन्न सुरक्षा अधिकारी अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांनी सहभाग घेतला. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री व साठवणूक करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा धडाका सुरू ठेवल्याने व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

नाशिक महापालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड!

जन सम्राट टाईम्स



नाशिक। प्रतिनिधी: नाशिक महापालिका कर्मचाऱ्यांसाठी यंदाची दिवाळी अधिक गोड होणार आहे. महापालिका कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची दखल घेत यंदा ३१ हजार ५०० रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची घोषणा महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी महासभेत केली. या निर्णयाचा लाभ महापालिका आस्थापनेवरील सुमारे साडेचार हजार कर्मचारी तसेच शासनाच्या अनुदानातून वेतन घेणारे सुमारे एक हजार कर्मचारी, अशा एकूण सुमारे साडेपाच हजार कर्मचाऱ्यांना होणार आहे. यंदाच्या सानुग्रह अनुदानासाठी महापालिका कर्मचारी-कामगार सेनेने ३१ हजार रुपये, तर भाजपप्रणित कर्मचारी संघटनेने ३१ हजार ५०० रुपये देण्याची मागणी केली होती. तसेच राष्ट्रवादी गटनेत्या सीमा ठाकरे, भाजप गटनेते ॲड. शाम बडोदे, शिवसेना गटनेते अजय बोरस्ते आणि सुधाकर बडगुजर यांनीही महापालिका कर्मचाऱ्यांना ३१ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा प्रस्ताव महासभेत मांडला होता. कोणाला मिळणार ३१,५०० रुपये? महापौरांच्या आस्थापनेवरील कायमस्वरूपी कर्मचारी, प्राथमिक शिक्षक, रोजंदारीवरील कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी, मानद वैद्यकीय अधिकारी, अंगणवाडी मुख्यसेविका, सेविका आणि मदतनीस यांना ३१ हजार ५०० रुपये सानुग्रह अनुदान मिळणार आहे. याशिवाय शासनाच्या अनुदानातून नियमित वेतन घेणाऱ्या तसेच संबंधित निकषांत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना महापालिका ७० टक्के प्रमाणात म्हणजे २२ हजार ५० रुपये अनुदान देण्यात येणार आहे. मात्र महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना या अनुदानाचा लाभ मिळणार नाही. महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधीक्षक अभियंता, शहर अभियंता, आरोग्याधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, मुख्य लेखापरीक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता आणि सहायक आयुक्त या पदांवरील अधिकाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे

"शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही"

शिंदेंचा परभणीतून विश्वास 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ;

जन सम्राट टाईम्स

परभणी । प्रतिनिधी: नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्तीचे औचित्य साधून 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ परभणीच्या भूमीतून करण्यात आला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्यात आला. मराठवाड्यासह परभणी जिल्हा दुष्काळाच्या संकटाला सामोरा जात असताना केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता संकटग्रस्त कुटुंबांना प्रत्यक्ष मदत करण्याचा संकल्प या अभियानातून करण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. शेतकरी कुटुंबांना मदत; मुलींना सायकली कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शिलाई मशीन, तर गरजू मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

यामुळे संकटग्रस्त कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच कार्यक्रमात मराठवाड्यातील गरजू रुग्णांच्या सेवेसाठी २५ रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. परभणीच्या



विकासासाठी १२० कोटींचा निधी परभणीच्या विकासासाठी यापूर्वी १२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. परभणीत उद्योगधंद्यांना चालना मिळावी यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांना यापूर्वीच सूचना केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शिंदे म्हणाले, "सरकारी तिजोरी ही शेतकऱ्यांची आहे. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही." संकटग्रस्त कुटुंबांशी साधला संवाद दुष्काळ आणि आत्महत्येमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांतील महिला व तरुणींशी शिंदे यांनी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. "मी तुमच्या सोबत आहे, काळजी करू नका," असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. शासन आणि शिवसेना संकटाच्या काळात या कुटुंबांच्या पाठीशी उभी राहील, असेही त्यांनी सांगितले. हजारो नागरिकांची उपस्थिती कार्यक्रमाला परभणी जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या सहभागामुळे 'सेवा संकल्प अभियानाला' मोठा प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्तीचे औचित्य साधून 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ परभणीच्या भूमीतून करण्यात आला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष मदतीचा हात देण्यात आला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

‘वॉटर-गटर-मीटर’पुरते मर्यादित राहू नका!

जनतेच्या सुख-दुःखातील ‘आपला माणूस’ बना ना. गुलाबराव पाटील यांचे नगरसेवकांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: म्हणजे केवळ ‘वॉटर-गटर-मीटर’ नव्हे. रस्ता, गटार, पाणी आणि वीज ही कामे करायचीच; मात्र त्यापलीकडे प्रभागातील प्रत्येक कुटुंबाच्या सुख-दुःखात धावून जाणारा ‘आपला माणूस’ अशी ओळख नगरसेवकाने निर्माण केली पाहिजे. निवडणूक जिंकण्यासाठी राजकारण लागते; मात्र पाच वर्षे जनतेच्या मनात राहण्यासाठी अभ्यास, काम आणि सातत्यपूर्ण संपर्क या तीन गोष्टी आवश्यक आहेत,” असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, केशवसृष्टी, उत्तन, भाईंदर (प.) येथे शिवसेनेच्या नवनिर्वाचित महानगरपालिका नगरसेवकांसाठी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिराच्या दुसऱ्या दिवसाचे उद्घाटन ना. गुलाबराव पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे केले. यावेळी त्यांनी नगरसेवकांशी संवाद साधत महापालिका कामकाज, निधी नियोजन, प्रशासनाशी समन्वय, जनसंपर्क, सभागृहातील भूमिका, शासकीय योजना तसेच पाणी बचतीबाबत मार्गदर्शन केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या ‘८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण’ या विचाराचा संदर्भ देत पाटील म्हणाले की, लोकप्रतिनिधीच्या कामातून सेवाभाव दिसला पाहिजे. “प्रभागातील नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवा. ज्येष्ठ नागरिक, युवक, व्यापारी तसेच महिला बचत गटांशी संवाद साधा. नगरसेवकाचे कार्यालय



हे जनसेवेचे छोटे केंद्र बनले पाहिजे,” असे त्यांनी सांगितले. अभ्यासाशिवाय सभागृहातील आवाज अपुरा प्रत्येक नगरसेवकाने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, वर्क ऑर्डर, अर्थसंकल्प आणि निधीचे स्रोत यांचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे पाटील यांनी नमूद केले. “महानगरपालिकेत पैसे नाहीत किंवा अधिकारी ऐकत नाहीत, एवढीच कारणे सांगून चालणार नाही. जनतेने तुम्हाला कारणे सांगण्यासाठी नव्हे, तर मार्ग काढण्यासाठी निवडून दिले आहे. सभागृहात आवाज जरूर उठवा; पण त्या आवाजाला अभ्यासाची जोड द्या. नुसता टेबल वाजवण्यापेक्षा हातात कागद, आकडे आणि नियम घेऊन प्रशासनाला उत्तर द्यायला भाग पाडा,” असे त्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात योग्य समन्वय असणे गरजेचे असून, प्रभागातील प्रश्न समजून घेण्यासाठी नगरसेवकांनी प्रत्यक्ष नागरिकांमध्ये जावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. “फेसबुकवर पन्नास पोस्ट टाकण्यापेक्षा प्रभागात अशी पाच कायमस्वरूपी कामे करा की पुढची वीस वर्षे लोक त्या कामाची आठवण काढतील. नगरसेवकाची खुर्ची पाच वर्षांची असते; पण चांगल्या कामाची आठवण पंचवीस वर्षांची असते. काम करा, संपर्क ठेवा, माणसं जोडा—तुमचं कामच तुमची ओळख सांगेल,” असे आवाहन पाटील यांनी केले. पाणी बचत आणि जलस्रोत संवर्धनावर भर देताना पाटील यांनी पाणी बचत, जलस्रोतांचे संवर्धन, पाणीगळती रोखणे आणि पाणीपुरवठा योजनांची योग्य देखभाल यावर भर दिला. “नवीन योजना उभारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि संवर्धनही महत्त्वाचे आहे. नगरसेवकांनी नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जागृती निर्माण करावी,” असे त्यांनी सांगितले. तज्ज्ञांकडून विविध विषयांवर मार्गदर्शन दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात ॲड. सुभाष काळे यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व स्थानिक कायदे, अभिजित सामंत यांनी प्रभागस्तरीय संपर्क कार्यालय व नागरिक तक्रार निवारण, मंदार हळबे यांनी विविध समित्या व नागरी प्राधिकरणांशी समन्वय, प्रशांत पिसोळकर यांनी महानगरपालिका अर्थसंकल्प व निधी नियोजन, तर गणेश खणकर यांनी महापालिका सभेचे कामकाज व प्रभावी सहभाग याबाबत मार्गदर्शन केले. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी ध्रुवकिशोर पाटील यांनी लोकप्रतिनिधी, महापालिका प्रशासन व नागरिक यांच्यातील समन्वय, शिवम पांडे यांनी सोशल मीडिया व डिजिटल जनसंपर्क, तर पीयूष गिरगावकर यांनी महानगरपालिकेतील पायाभूत सुविधा, नागरी समस्या व सुशासन प्रकल्पांवर मार्गदर्शन केले. ॲड. शेखर परदेशी व वैभव वाघ यांनी ‘धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष’ तसेच विविध शासकीय योजनांबाबत प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पांचाळ यांनी केले.रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळ पाटील आणि प्रशिक्षण विभाग प्रमुख सुरज आव्हाड यांनीही मार्गदर्शन केले. आनंद परांजपे यांनी आभार मानले. म्हणजे केवळ ‘वॉटर-गटर-मीटर’ नव्हे. रस्ता, गटार, पाणी आणि वीज ही कामे करायचीच; मात्र त्यापलीकडे प्रभागातील प्रत्येक कुटुंबाच्या सुख-दुःखात धावून जाणारा ‘आपला माणूस’ अशी ओळख नगरसेवकाने निर्माण केली पाहिजे. निवडणूक जिंकण्यासाठी राजकारण लागते; मात्र पाच वर्षे जनतेच्या मनात राहण्यासाठी अभ्यास, काम आणि सातत्यपूर्ण संपर्क या तीन गोष्टी आवश्यक आहेत,” असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे यांनी केले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, केशवसृष्टी, उत्तन, भाईंदर (प.) येथे शिवसेनेच्या नवनिर्वाचित महानगरपालिका नगरसेवकांसाठी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिराच्या दुसऱ्या दिवसाचे उद्घाटन ना. गुलाबराव पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

ऋषितीर्थ जैन मंदिरातील चोरीचा छडा!



जन सम्राट टाईम्स

इंदूर। प्रतिनिधी : परमार येथील ऋषितीर्थ जैन मंदिरातून चोरीला गेलेल्या अष्टधातूच्या भगवान आदिनाथ, अरहनाथ आणि महावीर भगवान यांच्या तीन मूर्ती अखेर पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. मंदिरातील चोरीच्या घटनेनंतर पोलिस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या मूर्तीसह अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी ऋषितीर्थ जैन मंदिरातून अष्टधातूच्या तीन मूर्तीसह काही अन्य साहित्य चोरीला गेले होते. धार्मिक महत्त्व असलेल्या मूर्ती चोरीला गेल्याने जैन समाजात चिंता आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर पोलिसांनी विविध पातळ्यांर तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करत ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन संशयितांकडून चोरीला गेलेल्या तीन मूर्ती व अन्य साहित्य हस्तगत केले. या कारवाईमुळे मंदिरातील चोरीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर चोरीला गेलेल्या प्राचीन व धार्मिक महत्त्वाच्या मूर्ती पुन्हा मिळाल्याने जैन समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे. पोलिसांच्या कारवाईचे समाजाच्या वतीने कौतुक करण्यात येत आहे. दरम्यान, धार्मिक व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मौल्यवान तसेच ऐतिहासिक महत्त्वाच्या मूर्ती व साहित्याची सुरक्षा अधिक बळकट करण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. प्रकरणातील संशयितांकडून चोरीबाबत अधिक माहिती मिळते का, तसेच या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याबाबत पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे.परमार येथील ऋषितीर्थ जैन मंदिरातून चोरीला गेलेल्या अष्टधातूच्या भगवान आदिनाथ, अरहनाथ आणि महावीर भगवान यांच्या तीन मूर्ती अखेर पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. मंदिरातील चोरीच्या घटनेनंतर पोलिस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या मूर्तीसह अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी ऋषितीर्थ जैन मंदिरातून अष्टधातूच्या तीन मूर्तीसह काही अन्य साहित्य चोरीला गेले होते. धार्मिक महत्त्व असलेल्या मूर्ती चोरीला गेल्याने जैन समाजात चिंता आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर पोलिसांनी विविध पातळ्यांर तपास सुरू केला.

अवैध गोवंश वाहतुकीवर पोलिसांचा छापा; ४ गोवंशांसह छोटा हत्ती जप्त

चारही आरोपींना न्यायालयाकडून एक दिवसाची पोलीस कोठडी

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद, । प्रतिनिधी : नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत उमाळा रोड परिसरात पोलिसांनी अवैध गोवंश वाहतुकीवर कारवाई करत चार जिवंत गोवंशांची सुटका केली असून, छोटा हत्ती वाहनासह एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने चौघांनाही ८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत एक दिवसाची पोलीस कोठडी (PCR) सुनावली आहे. उमाळा रोडवर संशयित वाहनाची तपासणी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास नशिराबाद पोलिसांचे पथक उमाळा रोड परिसरात गस्त घालत होते. यावेळी श्रीराम कंपनीच्या पुढील रस्त्यावर MH 04 GR 6203 क्रमांकाचे छोटा हत्ती मालवाहू वाहन संशयास्पदरीत्या जाताना पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी वाहन थांबवून पंचांसमक्ष तपासणी केली असता, वाहनात चार गोवंश दाटीवाटीने कोंबून वाहतूक केल्याचे आढळून आले. जनावरांसाठी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याचे तसेच वाहतुकीदरम्यान त्यांना इजा व यातना होण्याची शक्यता निर्माण होईल अशा पद्धतीने त्यांना डांबण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. वाहनचालकाकडे जनावरांच्या अधिकृत वाहतुकीचा परवाना आढळून आला नाही. असता,कत्तलीसाठी नेत असल्याचे त्यांनी सांगितल्याचे पोलिसांनी प्रेस नोटमध्ये नमूद केले आहे. १ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त पोलिसांनी केलेल्या कारवाईत एक काळ्या रंगाचा गोवंश, अंदाजे किंमत १० हजार रुपये, तीन तपकिरी रंगाचे गोवंश, प्रत्येकी अंदाजे १० हजार रुपये, तसेच MH 04 GR 6203 क्रमांकाचे छोटा हत्ती वाहन, अंदाजे किंमत १ लाख रुपये, असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विविध कलमान्वये गुन्हा दाखल पोलीस हवालदार क्रमांक ३४६ भरत शशिकांत बाविस्कर यांच्या फिर्यादीवरून चारही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३२५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५अ, ५ब व ९, प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(d), ११(१)(h), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११९ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम १२५(ई) सह मोटार वाहन कायदा कलम १७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारही आरोपींना एक दिवसाची PCR अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्याच्या पुढील तपासासाठी न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत एक दिवसाची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गैरकारभाराविरोधात उपोषणाचा दुसरा दिवस

जन सम्राट टाईम्स

जरंडी, ता. सोयगाव । (प्रतिनिधी): मौजे जरंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कथित गैरकारभार व आरोग्य सेवांमधील त्रुटींविरोधात सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. दोन दिवस उलटूनही प्रशासनाकडून मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना वाढत आहे. समस्त ग्रास्थांच्या वतीने पंचायत समिती, सोयगाव येथील गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. तसेच रुग्णांशी असभ्य वर्तन, आरोग्य सेविकेकडून रील तयार करून ती सोशल मीडियावर प्रसारित करणे, औषधनिर्माता उपलब्ध असतानाही शिपायामार्फत औषधांचे वाटप करणे, अशा विविध गंभीर बाबींकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा सुरळीत करण्यासाठी विविध मागण्या केल्या



आहेत. त्यामध्ये रिक्त पदे तातडीने भरणे, आवश्यक यंत्रसामुग्री व औषधसाठा कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे, औषधांचे वाटप औषधनिर्मात्याकडूनच करणे, सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करणे तसेच २४ तास कर्मचारी उपलब्ध ठेवून बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे, या मागण्यांचा समावेश आहे. “मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करणार” उपोषणकर्ते व ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, “दोन दिवस झाले, मात्र प्रशासन झोपले आहे.

यालाच शासन-प्रशासन म्हणायचे का? उद्यापर्यंत मागण्या मान्य न झाल्यास परिसरातील महिला, युवक व संपूर्ण ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपोषणस्थळी दाखल होतील आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल.” जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशी व आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. आंदोलनाची तीव्रता वाढण्यापूर्वी तालुका प्रशासनाने तोडगा काढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.मौजे जरंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कथित गैरकारभार व आरोग्य सेवांमधील त्रुटींविरोधात सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. दोन दिवस उलटूनही प्रशासनाकडून मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना वाढत आहे. समस्त ग्रास्थांच्या वतीने पंचायत समिती, सोयगाव येथील गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

बिलगाव प्राथमिक आरोग्य केंद्राची ऐतिहासिक कामगिरी!

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी: कुटुंब कल्याण कार्यक्रमात पुरुषांचा वाढता सहभाग अधोरेखित करणारी उल्लेखनीय कामगिरी धडगाव तालुक्यातील बिलगाव प्राथमिक आरोग्य केंद्राने केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र बिलगाव येथे आयोजित विशेष ‘एनएसव्ही’ (बिनकटीची पुरुष नसबंदी) शिबिरात तब्बल ७८ लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या. ग्रामीण भागात कुटुंब नियोजनाबाबत सकारात्मक मानसिकता निर्माण होत असल्याचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जात आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनवणे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र बिलगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेंद्र पावरा आणि डॉ. ओंकार वळवी यांनी शिबिराचे नियोजन व व्यवस्थापन प्रभावीपणे केले.



एकाच दिवसात ७८ शस्त्रक्रिया शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कुशल शल्यचिकित्सक डॉ. संतोष परमार आणि डॉ. योगेश वळवी यांनी तज्ज्ञतेने एकाच दिवसात तब्बल ७८ एनएसव्ही शस्त्रक्रिया पूर्ण केल्या. शिबिरातील नियोजन, वैद्यकीय सेवा आणि आरोग्य कर्मचाऱ्यांमधील समन्वयामुळे हे उद्दिष्ट यशस्वीपणे साध्य झाले. जिल्हाधिकाऱ्यांकडून आरोग्य पथकाचे कौतुक आरोग्य यंत्रणेच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. मिताली शेटे यांनी वैद्यकीय अधिकारी, शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागाच्या संपूर्ण पथकाचे विशेष कौतुक केले. ग्रामीण भागात कुटुंब कल्याण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी आरोग्य विभागाच्या प्रयत्नांना या कामगिरीमुळे बळ मिळाले आहे. जनजागृतीला मिळाले यश पुरुष नसबंदीबाबत असलेले गैरसमज दूर करून कुटुंब नियोजनाच्या जबाबदारीत पुरुषही सक्रियपणे सहभागी होत असल्याचे या शिबिरातून दिसून आले. महिलांप्रमाणेच पुरुषांनीही कुटुंब नियोजनाच्या निर्णयात पुढाकार घेण्याची सकारात्मक भूमिका या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे. वैद्यकीय अधिकारी, शल्यचिकित्सक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे बिलगाव प्राथमिक आरोग्य केंद्राने साधलेल्या या कामगिरीचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

वरणगावातील स्वस्त धान्य दुकानातील निकृष्ट धान्याचा मुद्दा ऐरणीवर!

सुनीलभाऊ काळे यांच्याकडून धान्यसाठ्याची पाहणी; जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी

जन सम्राट टाईम्स

वरणगाव । प्रतिनिधी: शासकीय स्वस्त धान्य दुकानातील धान्यसाठ्याच्या गुणवत्तेचा गंभीर प्रश्न समोर आला आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनीलभाऊ काळे यांनी स्वस्त धान्य दुकानाला भेट देऊन तेथील धान्यसाठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तांदळामध्ये आळी पडल्याचे, तसेच इतर काही धान्यसाठ्यातही किड लागल्याचे निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू नागरिकांना वितरित करण्यात येणारे धान्य दर्जेदार आणि वापरण्यायोग्य असणे आवश्यक आहे. मात्र, पाहणीदरम्यान धान्याची गुणवत्ता समाधानकारक नसल्याचे आढळून आल्याने नगराध्यक्ष काळे यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली. जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून धान्याचा दर्जा तपासावा आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नगराध्यक्ष सुनीलभाऊ काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली. तसेच नागरिकांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळावे आणि भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी पुरवठा विभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुरवठा अधिकाऱ्यांचीही भेट याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याबरोबरच पुरवठा



अधिकारी महेश चौधरी तसेच तालुका पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची भेट घेऊनही निवेदन देण्यात आले. धान्याची गुणवत्ता, साठवणूक आणि लाभार्थ्यांना होणारे वितरण याबाबत योग्य ती तपासणी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या प्रसंगी नगरसेवक नाना चौधरी, जनसेवक तेजस कुमार जैन, योगेश माळी, मयूर शेळके, सुनील माळी, शामराव धनगर, कुंदन माळी आणि कामगार नेते मिलिंद मेढे उपस्थित होते.

स्वस्त धा्य दुकानातील धान्याची अधिकृत तपासणी करून प्रत्यक्षात धान्य निकृष्ट असल्याचे निष्पन्न होते का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.शासकीय स्वस्त धान्य दुकानातील धान्यसाठ्याच्या गुणवत्तेचा गंभीर प्रश्न समोर आला आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनीलभाऊ काळे यांनी स्वस्त धान्य दुकानाला भेट देऊन तेथील धान्यसाठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तांदळामध्ये आळी पडल्याचे, तसेच इतर काही धान्यसाठ्यातही किड लागल्याचे निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले. शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू नागरिकांना वितरित करण्यात येणारे धान्य दर्जेदार आणि वापरण्यायोग्य असणे आवश्यक आहे. मात्र, पाहणीदरम्यान धान्याची गुणवत्ता समाधानकारक नसल्याचे आढळून आल्याने नगराध्यक्ष काळे यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली. जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून धान्याचा दर्जा तपासावा आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नगराध्यक्ष सुनीलभाऊ काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली. तसेच नागरिकांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळावे आणि भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी पुरवठा विभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पुरवठा अधिकाऱ्यांकडे निवेदन देण्याबरोबरच पुरवठा अधिकारी महेश चौधरी तसेच तालुका पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची भेट घेऊनही निवेदन देण्यात आले.

कागदपत्रांवर सह्या घेतल्या कर्ज दिलंच नाही!

जन सम्राट टाईम्स

ठाणे। प्रतिनिधी: आदिवासी सेवा सोसायटी, खोडाळा येथील आदिवासी खातेदारांनी सोसायटी प्रशासनाकडून फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. पीक कर्जमाफीनंतर नवीन कर्जवाटप करण्याचे आश्वासन देऊन स्वाक्षऱ्या घेतल्या, मात्र प्रत्यक्षात कर्ज न दिल्याने संतप्त शेतकऱ्यांनी मोखाडा तहसीलदार, पोलीस ठाणे आणि पालघर जिल्हा प्रशासनाकडे धाव घेऊन संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.संबंधित आदिवासी खातेदारांचे यापूर्वीचे सोसायटी कर्ज शासनाकडून माफ झाले होते. त्यानंतर २०२४मध्ये पुढील शेतीकामांसाठी नवीन कर्जाची मागणी खातेदारांनी नोंदवली. त्यावेळी सोसायटी कार्यालयात खातेदारांकडून आवश्यक त्या कागदपत्रांवर सह्या घेतल्या आणि ३० तारखेपर्यंत कर्जाचे वाटप केले जाईल, असा शब्द दिला. मात्र, आदिवासी सेवा सोसायटीचे सचिव विष्णू जोशी यांच्याकडून अद्याप कर्जवाटप झाले नसल्याचा आरोप खातेदारांनी अर्जात केला आहे. वारंवार कार्यालयात चकरा मारूनही कर्ज न मिळाल्याने शेतकरी हवालदील झाले आहेत.ऐन हंगामात हक्काचे कर्ज न मिळाल्याने आदिवासी शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. परिणामी, शेतीचा खर्च भागवण्यासाठी काही खातेदारांना घरातील दागिने सावकारांकडे गहाण ठेवण्याची नामुष्की ओढवली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून आदिवासी शेतकऱ्यांना तत्काळ न्याय द्यावा आणि फसवणूक करणाऱ्या दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.आडोशीचे शेतकरी प्रकाशा गांगुर्डे स्पष्टच म्हणाले की, ‘शेतकऱ्यांनी विश्वासाने सोसायटीकडे मदतीची अपेक्षा केली होती.

धुळे गरबा महोत्सव 2.0 ला महिलांचा जल्लोषी प्रतिसाद!

शिबिराच्या पहिल्याच दिवशी ५०० हून अधिक महिलांची उपस्थिती; आयुक्त नितीन कापडणीस यांचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: महिलांचा उत्सव, संस्कृतीचा जागर आणि आनंदाची पर्वणी ठरणाऱ्या 'धुळे गरबा महोत्सव 2.0' अंतर्गत आयोजित विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराला पहिल्याच दिवशी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणाच्या उद्घाटनाच्या दिवशीच ५०० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवत गरबा शिकण्याची उत्सुकता दाखवली. त्यामुळे शिबिराला सुरुवातीपासूनच उत्सवी वातावरण लाभले. धुळे महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या हस्ते विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजक ललित गंगाधर माळी, हरीश गंगाधर माळी, तसेच धुळे गरबा महोत्सवाच्या संकल्पक प्रियंका ताई जगदीश माने यांच्यासह मान्यवर आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. दुसऱ्या वर्षीही महिलांसाठी विनामूल्य प्रशिक्षण धुळे गरबा महोत्सवाच्या माध्यमातून सलग दुसऱ्या वर्षी महिलांसाठी विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोणताही आर्थिक भार न टाकता महिलांना गरबा शिकण्याची, एकत्र येण्याची आणि उत्सवाचा आनंद घेण्याची संधी या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. पहिल्याच दिवशी ५०० हून अधिक महिलांनी उपस्थिती लावल्याने या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद अधोरेखित झाला आहे. सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत प्रशिक्षण सुरू असून, अधिकाधिक महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. 'झाडे लावा, पण त्यांचे संगोपनही करा' उद्घाटनप्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस यांनी गरबा महोत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत उपस्थित महिलांना महत्त्वपूर्ण



संदेश दिला. केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर लावलेल्या प्रत्येक झाडाच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने हिन्यातून काही वेळ पर्यावरणासाठी देऊन झाडांची काळजी घ्यावी. धुळे शहराला स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर बनविण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबत नागरिकांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे, असे कापडणीस यांनी स्पष्ट केले. दुष्काळात पाण्याची बचत करण्याचे आवाहन सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा संदर्भ देताना आयुक्तांनी पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्याचे आवाहन केले. पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात आपला सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मनपाच्या डिजिटल सुविधांचा लाभ घ्या धुळे महानगरपालिकेने नागरिकांसाठी विविध डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, अनेक सेवा आता घरबसल्या ऑनलाइन पद्धतीने घेता येतात. नागरिकांनी या सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, तसेच धुळे महानगरपालिकेच्या अधिकृत Facebook आणि Instagram खात्यांशी जोडून राहावे, असे आवाहनही आयुक्त कापडणीस यांनी केले. गरब्यासोबत सामाजिक संदेशाचीही जोड 'धुळे गरबा महोत्सव 2.0' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न राहता महिलांचा उत्सव, संस्कृतीचा जागर, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम म्हणून आकार घेत आहे. पहिल्याच दिवशी मिळालेला महिलांचा प्रचंड प्रतिसाद पाहता यंदाचा गरबा महोत्सवही उत्साहात आणि संस्मरणीय वातावरणात पार पडण्याची चिन्हे आहेत. महिलांचा उत्सव, संस्कृतीचा जागर आणि आनंदाची पर्वणी ठरणाऱ्या 'धुळे गरबा महोत्सव 2.0' अंतर्गत आयोजित विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराला पहिल्याच दिवशी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणाच्या उद्घाटनाच्या दिवशीच ५०० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवत गरबा शिकण्याची उत्सुकता दाखवली. त्यामुळे शिबिराला सुरुवातीपासूनच उत्सवी वातावरण लाभले. धुळे महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या हस्ते विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजक ललित गंगाधर माळी, हरीश गंगाधर माळी, तसेच धुळे गरबा महोत्सवाच्या संकल्पक प्रियंका ताई जगदीश माने यांच्यासह मान्यवर आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. दुसऱ्या वर्षीही महिलांसाठी विनामूल्य प्रशिक्षण धुळे गरबा महोत्सवाच्या माध्यमातून सलग दुसऱ्या वर्षी महिलांसाठी विनामूल्य गरबा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोणताही आर्थिक भार न टाकता महिलांना गरबा शिकण्याची, एकत्र येण्याची आणि उत्सवाचा आनंद घेण्याची संधी या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधोरेखित झाला आहे. सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत प्रशिक्षण सुरू असून, अधिकाधिक महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. 'झाडे लावा, पण त्यांचे संगोपनही करा' उद्घाटनप्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस यांनी गरबा महोत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत उपस्थित महिलांना महत्त्वपूर्ण संदेश दिला. केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर लावलेल्या प्रत्येक झाडाच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने हिन्यातून काही वेळ पर्यावरणासाठी देऊन झाडांची काळजी घ्यावी. धुळे पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात आपला सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मनपाच्या डिजिटल सुविधांचा लाभ घ्या धुळे महानगरपालिकेने नागरिकांसाठी विविध डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, अनेक सेवा आता घरबसल्या ऑनलाइन पद्धतीने घेता येतात. नागरिकांनी या सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, तसेच धुळे महानगरपालिकेच्या अधिकृत Facebook आणि Instagram खात्यांशी जोडून राहावे, असे आवाहनही आयुक्त कापडणीस यांनी केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

सारोळा शाळेत सेवा संकल्प अभियानांतर्गत माजी विद्यार्थी मेळावा



जन सम्राट टाईम्स

जामखेड। प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा येथे बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सेवा संकल्प अभियानांतर्गत माजी विद्यार्थी मेळावा, माता पालक सभा आणि शिक्षक-पालक सभा यांचा संयुक्त कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि शिक्षकांच्या सक्रिय सहभागामुळे शाळेच्या सर्वांगीण विकासासाठीची सामूहिक बांधिलकी या कार्यक्रमातून अधोरेखित झाली. कार्यक्रमात शाळेच्या भौतिक सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नवीन दोन वर्गखोल्यांचे बांधकाम तसेच सुमारे १० लाख रुपयांच्या वर्गखोली दुरुस्तीच्या कामाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही विचारविनिमय झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालकांची भूमिका महत्त्वाची विद्यार्थ्यांची शालेय स्पर्धा परीक्षांची तयारी, घरचा अभ्यास, नियमित अभ्यासाची सवय आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांची भूमिका याबाबत पालकांशी सुसंवाद साधण्यात आला. शाळा आणि पालक यांच्यातील समन्वयातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीस अधिक चालना मिळू शकते, यावर भर देण्यात आला.सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध शासकीय योजनांची माहिती शाळेतील शिक्षकांनी पालकांना दिली. यासोबतच प्लास्टिक कचरा संकलन, पाणी बचतीचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास या विषयांवर जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा माजी सरपंच अजय काशीद यांनी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सारोळा शाळेच्या उपक्रमांचे केंद्रप्रमुखांकडून कौतुक राजुरी केंद्राचे केंद्रप्रमुख माजीद शेख यांनी सारोळा शाळेच्या विविध उपक्रमांचे तसेच स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले.

शाळेच्या प्रगतीत शिक्षक, पालक आणि माजी विद्यार्थ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी शाळेच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. नवनियुक्त शिक्षिकेचा सन्मान; शाळेला देणगी पवित्र पोर्टलच्या शिक्षक भरती प्रक्रियेतून नुकत्याच भाषा पदवीधर शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या अर्चना त्रिमुखे यांचा उपस्थित महिला भगिनींच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य किरण मुळे यांचा वाढदिवस शाळेच्या वतीने साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त त्यांनी शाळेस २ हजार रुपयांची रोख देणगी दिली. शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थी व पालकांचे योगदान शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या माजी विद्यार्थी, माता, पालक आणि ग्रामस्थांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

घरगुती गॅसच्या व्यावसायिक वापराच्या चौकशीत 'बनावट पंचनामा'चा आरोप!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ। प्रतिनिधी : भुसावळ शहरात घरगुती एलपीजी सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या तक्रारीच्या चौकशीला आता गंभीर वळण मिळाले आहे. चौकशीदरम्यान नियमबाह्य पद्धतीने 'बनावट पंचनामा' तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केल्याने पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या आरोपांची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत भुसावळ तहसीलदारांना संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे जबाब, आवश्यक पुरावे आणि स्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. भुसावळ येथील माऊली प्लाझा, श्रद्धानगर, जामनेर रोड परिसरातील रहिवासी प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी शहरात घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याबाबत तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने निरीक्षण अधिकारी, भुसावळ यांनी २३ एप्रिल २०२६ रोजी संत गजानन महाराज मंदिर परिसरात स्थळ पाहणी केली होती. मात्र, या पाहणीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या पंचनाम्याच्या प्रक्रियेवरच तक्रारदाराने आक्षेप घेतला आहे. पंचनामा तयार करताना नियमांचे पालन झाले नसल्याचा तसेच बनावट पंचनामा तयार केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. तक्रारदाराने पंचनामा व चौकशी प्रक्रियेतील विविध बाबींवर मुद्देनिहाय आक्षेप नोंदवल्यानंतर जिल्हा पुरवठा विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव यांनी भुसावळ तहसीलदारांना चौकशीचे निर्देश दिले असून, संबंधित प्रकरणाची चौकशी करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे जबाब नोंदविण्यास सांगितले आहे. तसेच चौकशीशी संबंधित आवश्यक कागदपत्रे व पुरावे तपासून, त्याबाबतचा स्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल विनाविलंब सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणात नेमका पंचनामा कसा तयार करण्यात आला, त्यातील नोंदी वस्तुस्थितीशी जुळतात का आणि चौकशी प्रक्रियेत नियमांचे पालन झाले का, याबाबत आता प्रशासनाकडून स्पष्टता येण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणात भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या स्तरावरही चौकशीची मागणी करण्यात आली आहे. विक्री अधिकारी अथवा तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत स्वतंत्र चौकशी करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित कागदपत्रे व तक्रारदाराने उपस्थित केलेले आक्षेप क्षेत्रीय अधिकारी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, बाटलिंग प्लँट, एमआयडीसी, जळगाव यांच्याकडे पुढील नियमानुसार कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे समोर आले आहे. घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. मात्र, या प्रकरणात चौकशी करणाऱ्या यंत्रणेनेच तयार केलेल्या पंचनाम्यावर गंभीर आक्षेप घेण्यात आल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. आता जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर होणाऱ्या चौकशीत 'बनावट पंचनामा'च्या आरोपामागील सत्य काय, यासह घरगुती गॅसच्या कथित व्यावसायिक वापराबाबतही काय निष्पन्न होते, याकडे भुसावळकरांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठ्यासाठी महावितरणची मोहीम

जन सम्राट टाईम्स



एरंडोल । (प्रतिनिधी): नशिराबादमध्ये ॲल्युमिनियम तार चोरी रोखण्यासाठी पोलीस-महावितरणची संयुक्त बैठक; सहा महिन्यांत ३ मोठ्या चोरीच्या घटना नशिराबाद, दि. ७ ऑक्टोबर २०२६ (प्रतिनिधी) : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सुरळीत व अखंडित वीजपुरवठा मिळावा आणि वीजवाहिनीवरील तार चोरीमुळे शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडित होऊन पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी महावितरणने आता ठोस पाऊल उचलले आहे. नशिराबाद परिसरात शेतीपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या लघुदाब वाहिनीवरील ॲल्युमिनियम तारांची रात्रीच्या वेळी वारंवार चोरी होत असल्याने या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन आणि महावितरण यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. नशिराबाद शहर कक्षाचे सहाय्यक अभियंता पवन सुधाकर वाघुळदे तसेच नशिराबाद पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या उपस्थितीत महावितरणचे अधिकारी-कर्मचारी आणि पोलीस प्रशासन यांच्यात बैठक झाली. वीजवाहिनीवरील तार चोरीच्या घटनांना आळा घालणे, शेतकऱ्यांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवणे आणि चोरीच्या घटनांमागील व्यक्तींवर कठोर कारवाई करणे, याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. दुष्काळात तार चोरीचा शेतकऱ्यांना दुहेरी फटका सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत शेतीपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या वाहिनीवरील तार चोरीला गेल्यास संबंधित परिसरातील वीजपुरवठा बंद होतो. परिणामी पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतीपिकांचे नुकसान होण्याबरोबरच शेतकऱ्यांवर आर्थिक संकट अधिक गडद होण्याची शक्यता निर्माण होते. दुसरीकडे चोरी झालेल्या तारांची पुनर्बांधणी, दुरुस्ती आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणलाही आर्थिक भार सहन करावा लागतो. त्यामुळे तार चोरी हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून शेतकरी आणि वीज वितरण व्यवस्थेवर थेट परिणाम करणारा गंभीर मुद्दा बनला आहे. सहा महिन्यांत तीन मोठ्या चोरीच्या घटना नशिराबाद परिसरात मागील सहा महिन्यांत वीजवाहिनीवरील ॲल्युमिनियम तार चोरीच्या तीन गंभीर घटना घडल्या आहेत. २३ ऑगस्ट २०२६ : गुन्हा क्रमांक २३७ अंतर्गत २७ विद्युत पोलवरील ॲल्युमिनियम तार चोरी. २९ सप्टेंबर २०२६ : गुन्हा क्रमांक २६१ अंतर्गत १६ विद्युत पोलवरील ॲल्युमिनियम तार चोरी. या सलग घटनांमुळे संबंधित भागातील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला. दुष्काळी परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्याने पिकांना पाणी देण्यात अडथळे निर्माण होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

जामखेडमध्ये महामार्गावरील अतिक्रमणांवर नगरपरिषदेचा धडक हातोडा!

जन सम्राट टाईम्स

जामखेड : । प्रतिनिधी: शहरातील जामखेड-सौताडा महामार्गालगत गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या अतिक्रमणाच्या गंभीर प्रश्नावर अखेर नगरपरिषदेने धडक कारवाई सुरू केली आहे. जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने महामार्गालगतची अतिक्रमणे हटविण्याची मोहीम हाती घेतली असून, या कारवाईमुळे बेकायदेशीर अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत. कारवाईला सुरुवात होताच नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या गटारापासून तब्बल १० फुटांपर्यंतच्या जागेवरील अतिक्रमणे हटविण्यास प्रशासनाने सुरुवात केली आहे. या अतिक्रमणांमुळे महामार्गाची उपलब्ध रुंदी कमी होऊन शहरात वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत होती. वाहनांची मोठी वर्दळ असलेल्या या मार्गावर वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. जामखेडकरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीविरोधात



जामखेडकरांनी सातत्याने आवाज उठविला होता. निवेदने, बैठका, प्रशासनाकडे पाठपुरावा तसेच आंदोलनांच्या माध्यमातून नागरिकांनी हा प्रश्न लावून धरला होता. अखेर प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केल्याने नागरिकांच्या दीर्घकाळच्या मागणीला यश आले आहे. या कारवाईचे सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी स्वागत केले आहे. हा केवळ अतिक्रमण हटविण्याचा निर्णय नसून, जामखेडकरांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचा विजय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कारवाईत दुजाभाव नको; निष्पक्ष मोहिमेची अपेक्षा दरम्यान, प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम काही ठराविक ठिकाणांपुरती मर्यादित न ठेवता नियमाप्रमाणे, पारदर्शक आणि कोणताही दुजाभाव न करता राबवावी, अशी अपेक्षा नागरिकांसह सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. महामार्गालगतच्या सर्व अतिक्रमणांवर समान निकषाने कारवाई करण्याची मागणीही पुढे आली आहे. दिलासा महामार्गालगतची अतिक्रमणे हटवल्यानंतर रस्त्याची उपलब्ध जागा वाढणार असून, त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होण्याची शक्यता आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत निर्माण होणारी वाहतूक कोंडी, वाहनांची अडथळ्याची स्थिती आणि पादचाऱ्यांची गैरसोय कमी होण्याची अपेक्षा आहे. मात्र, अतिक्रमणे हटवल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये, यासाठी नगरपरिषदेने कायमस्वरूपी यंत्रणा उभारून नियमित देखरेख ठेवावी, अशी मागणी आता जामखेडकरांकडून होत आहे. त्यामुळे सध्या सुरू झालेली कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे

सेवा संकल्प अभियानांतर्गत धुळ्यात पंतप्रधान मोदींच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण

जन सम्राट टाईम्स

धुळे, । प्रतिनिधी: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नसून प्रत्येक नागरिकाने आपले गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देशाच्या विकासात यथार्थ योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारप्रमुख म्हणून २५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याच्या निमित्ताने सेवा संकल्प अभियानांतर्गत नवी दिल्ली येथून केलेल्या भाषणाचे थेट प्रक्षेपण धुळ्यातील मालेगाव रोडवरील आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री रावल बोलत होते. कार्यक्रमाला आमदार अनुपभैया अग्रवाल, धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, महापौर मायादेवी परदेशी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, जयश्री अहिरराव, कल्पना महाले, प्रतिभा चौधरी यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'गुजरात मॉडेल'पासून



देशाच्या विकासाची झेप पालकमंत्री रावल म्हणाले की, ७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर सलग तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्री आणि २०१४ पासून देशाचे पंतप्रधान म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या कार्यकाळात झालेला विकास देशभरात 'गुजरात मॉडेल' म्हणून ओळखला गेला. त्यानंतर पंतप्रधान म्हणून गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारताने विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली आहे. डिजिटल क्रांती, पायाभूत सुविधा, आत्मनिर्भरता आणि विविध क्षेत्रांतील विकासामुळे भारताची वाटचाल वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून ईशान्य भारतापर्यंत विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

देशापुढील अनेक आव्हानांवर केंद्र सरकारने मात केली असून, भारताच्या विकासाच्या या मॉडेलकडे जगातील अनेक देशांचे लक्ष वेधले गेले आहे, असेही रावल यांनी नमूद केले. विकसित भारताचा संकल्प करूया १४० कोटी देशवासीयांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान मोदी अहोरात्र कार्यरत आहेत. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभे करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. भारताच्या विकासामुळे जगातील अनेक प्रमुख राष्ट्रे भारतात गुंतवणुकीसाठी पुढे येत आहेत. त्यामुळे देशात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास होत आहे, असे रावल म्हणाले. पंतप्रधानांच्या कार्यातून प्रेरणा घेत आपापसांतील हेवेदावे बाजूला ठेवून देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मंत्र्यांच्या प्रोटोकॉलचा भंग भोवला

जन सम्राट टाईम्स

भाईंदर । प्रतिनिधी: शासकीय कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेत कॅबिनेट मंत्र्यांचा राजशिष्टाचारानुसार उल्लेख न करणे मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाला चांगलेच महागात पडले आहे. प्रोटोकॉलच्या कथित उल्लंघनाची राज्य शासनाने गंभीर दखल घेत चौकशी केल्यानंतर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांची मिरा-भाईंदरमधून बदली करण्यात आली आहे. त्यांची वसई-विरार शहर महानगरपालिकेत उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या जागी सचिन बांगर यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिका वर्तुळात या कारवाईची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात झाली ती १५ एप्रिल २०२६ रोजीच्या क्रीडा संकुलाच्या लोकार्पण सोहळ्यापासून. कार्यक्रमासाठी छापण्यात आलेल्या निमंत्रणपत्रिकेचा मसुदा राजशिष्टाचार अधिकाऱ्यांकडून तपासून आणि प्रमाणित करून घेणे आवश्यक होते. मात्र, ही प्रक्रिया पूर्ण न करताच निमंत्रणपत्रिका छापण्यात आल्याचे चौकशीत समोर आले. विशेष म्हणजे, या निमंत्रणपत्रिकेत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या नावाचा राजशिष्टाचार व ज्येष्ठता क्रमानुसार आवश्यक तो उल्लेख करण्यात आला नसल्याचा मुद्दा पुढे आला. त्यामुळे केवळ एका निमंत्रणपत्रिकेतील मजकुराचा विषय न राहता हा थेट शासकीय प्रोटोकॉलच्या पालनाचा प्रश्न बनला. वर्षानिमित्त आयोजित कामगार दिन सत्कार समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेचाही मुद्दा चौकशीच्या कक्षेत आला. या निमंत्रणपत्रिकेचा मसुदा अधिकृत मंजुरी आणि आवश्यक राजशिष्टाचार प्रक्रिया पूर्ण न करता अंतिम केल्याचे चौकशीत नमूद करण्यात आले.